दैनिक

# श्रमिक लोकराज्य

नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली येथे वितरीत होणारे वृत्तपत्र

संपादक – डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव : 7875782377    कार्यकारी संपादक – वैजनाथ स्वामी

दैनिक । नांदेड । वर्ष ४ थे । अंक २१२ । रविवार, दि.०४ मे २०२५ । RNI MAHMAR/2021/85752 । पाने ०४ । DAINIK SHRAMIK LOKRAJYA । किंमत २ रूपये । ई–पेपर : www.shramiklokrajya.in

# भारताचा पाकिस्तानला आणखी एक मोठा दणका

**दिल्ली:** पहलगाम हल्ल्यानंतर भारत शत्रु राष्ट्र पाकिस्तानला एकामागून एक धक्के देत आहे. आता भारताने देशांतर्गत व्यापाराबाबत मोठे पाऊल उचलले आहे. भारताने पाकिस्तानकडून होणाऱ्या सर्व वस्तूंच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात- निर्यातीवर बंदी घातली आहे. म्हणजे भारताने दोन्ही देशातील व्यापार पूर्णपणे थांबवला आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानविरोधी कडक कारवाई सुरू केली आहे. या हल्ल्यानंतर भारताने सिंधू नदी करार रद्द केला, भारतातील पाकिस्तानी अधिकारी आणि नागरिकांना भारत सोडण्यास सांगितले. पाकिस्तानी मीडिया तसेच सोशल मीडिया चॅनेल्सवर बंदी घातली आहे. अटारी बॉर्डर बंद केली. भारताने पाकिस्तानविरोधात यांसारखे महत्त्वपूर्ण पावले उचलत, पाकिस्तानची कोंडी केली आहे.

पुढील आदेशापर्यंत आयात-निर्यातीवर बंदी




भारताने पाकिस्तानमधून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली आहे, असे वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे. पाकिस्तानमधून थेट आयात कमी झाली असली तरी, काही वस्तू अप्रत्यक्ष मार्गांनी किंवा तिसऱ्या देशांमधून देशात येत होत्या. त्यामुळे भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने पाकिस्तानविरोधात कठोर निर्णय घेतला. मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, परराष्ट्र व्यापार धोरणात (FTP) नव्याने जोडलेल्या तरतुदीमध्ये "पुढील आदेशापर्यंत पाकिस्तानमध्ये उद्भवणाऱ्या किंवा निर्यात होणाऱ्या सर्व वस्तूंच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूकीवर तात्काळ बंदी" घालण्याचा उल्लेख आहे.

पाकिस्तानचा आंतरराष्ट्रीय निधी थांबवण्याची तयारी

दुसरीकडे, पाकिस्तानला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करण्यासाठी, भारत आयएमएफ (IMF), जागतिक बँक (WB) आणि आशियाई विकास बँकेकडून (ADB) पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय आर्थिक मदतीचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी करेल. पाकिस्तानला देण्यात येणारी आर्थिक मदत दहशतवादाला चालना देण्यासाठी वापरली जात असल्याचा भारताचा आरोप आहे, त्यामुळे पाकिस्तानला देण्यात येणारा निधी थांबवला जाईल. पाकिस्तानवर आर्थिक दबाव आणण्यासाठी भारत पाकिस्तानला फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सच्या (FATF) 'ग्रे लिस्ट'मध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न करेल. जूनमध्ये होणाऱ्या FATF बैठकीत भारत ही मागणी करणार आहे.




छत्रपती संभाजीनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालयात टु-बीम युनिटचे उद्घाटन व राज्य कर्करोग संस्थेच्या विस्तारीकरणाचा लोकार्पण सोहळ्याला भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी.नड्डाजी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आले असता त्यांची भेट घेऊन स्वागत करतेवेळी भारतीय जनता पक्षाचे मराठवाडा विभाग संघटन मंत्री संजयभाऊ कौडगे.



## भेटी लागे जीवा... विठ्ठला....!

विठ्ठल नाम जप करून मुखेड तालुक्यातील शेकडो भाविक पंढरपूर कडे विठ्ठलाच्या दर्शनाला निघाले आहेत. यावेळी भाविक मुखेड येथील आर्य वैश्य मंगल कार्यालय येथे एकत्र येऊन विठ्ठल नामाचा जपही केला.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची मुंबई येथील देवगिरी या निवासस्थानी भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी लोहा- कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आ.मोहनराव हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, उदय चव्हाण आदींची उपस्थिती होती.
छायाचित्र - दत्ता पाटील माळेगावे




**भेट**

नांदेड चे अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांना दैनिक श्रमिक लोकराज्य वर्धापन दिनानिमित्त अंक देताना नांदेड प्रतिनिधी कृष्णा मठपती.




मुक्रमाबाद येथील दैनिक सकाळ चे पत्रकार विनोद आपटे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक श्रमिक लोकराज्य चे संपादक ज्ञानेश्वर डोईजड व ॲड.राचलवार

### सांगवीतील शेती पाण्याअभावी धोक्यात; विहिरींच्या पाण्याने गाठला तळ

**सांगवी:** बारामती तालुक्यातील सांगवी परिसरातील शेती निरा डावा कालव्याच्या वितरिका क्र. 18 वर अवलंबून आहे. या वितरिकेवरील सांगवी परिसरातील शेती पाण्याअभावी धोक्यात आली आहे. जलसंपदा विभाग व पाणी वापर संस्थांच्या ढिसाळ नियोजनामुळे शेतातील उभ्या पिकांचे नुकसान होत असल्याचा आरोप लाभधारक शेतकऱ्यांमधून होत आहे. शेती पिके वाचविण्यासाठी तातडीने वितरिकेला आवर्तन सोडण्याची मागणी जोर धरू लागली आहे. निरा डावा कालव्याच्या वितरिका क्र. 18 वर सांगवी, शिरवली, कांबळेश्वर, शिरष्णे, धुमाळवाडी, मानाजीनगर, भिकोबानगर व पवईमाळ या गावांतील शेती अवलंबून आहे. या वितरिकेला मागील आवर्तन 9 मार्च रोजी सोडण्यात आले होते.

# मुखेड तालुक्यात पाणी टंचाईचे विदारक चित्र

## १९ टँकरने पाणी पुरवठा तर ७१ अधिग्रहणाचे प्रस्ताव ; प्रस्तावास अद्याप मंजुरी नाही !

## जलजीवन मिशनच्या कामाचे ८० टक्के काम पुर्ण होऊनही गावात पाण्याची कमतरता

### जलजीवन योजना म्हणजे गुत्तेदार अन अधिका-यासाठी सोन्याची अंडी ; झालेल्या कामाची वरीष्ठ अधिका-यामार्फत चौकशी करण्याची मागणी

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**मुखेड / ज्ञानेश्वर डोईजड**

उन्हाचा पारा सध्या ४३ अंशाच्या वर आहे. तरीही ग्रामीण भागात महिला, नागरीक पाण्यासाठी वणवण भटकत पाणी आणून आपला संसार, लेकरांचे शिक्षण , घरातील कामे करीत असतात. तालुक्यात मुखेड तालुक्यात पाणी टंचाईचे विदारक चित्र असुन १९ टँकरने पाणी पुरवठा ग्रामीण भागातील गावांना केला जातो.

तालुक्यात ७१ विहीर , बोअर अधिग्रहणाचे प्रस्ताव आले असुन काही त्रुटी असल्याने या प्रस्तावांना अद्याप मंजुरी नसल्याची माहिती मिळाली आहे.







छाया - हाफिजखान पठाण

यामुळे या प्रस्तावांच्या त्रुटी काढून तात्काळ प्रस्तावांना मंजुरी दयावी अशी मागणी नागरीकांतून होताना दिसत आहे.

मुखेड तालुक्यातील वसुर या गावी जलजीवन मिशनचे काम चालु आहे. सदरील काम 80 टक्के पुर्ण होऊनही येथील नागरीकांना या योजनेचा म्हणावा तसा फायदा झालेला दिसून येत नाही. पाणी पुरवठा विभागाचे जलसंधारण अधिकारी भोजराज यांनी दिलेल्या माहितीवरुन 80 टक्के काम झालेले आहे. पण सविस्तर माहिती इंजिनियरला विचारुन सांगतो असे म्हणत त्यांनी ही माहिती दिली.

**जल जीवन मिशन योजनेद्वारे अनेक ठिकाणी पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी असून ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर गुणवत्तापूर्ण पाण्याचा पुरवठा दररोज करणे हे जल जीवन अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे .**



**कडक उन्हाळा यात उन्हारा पारा ४३ ते ४४ अंशापर्यंत जात असताना महिलांच्या डोक्यावरील हंडा मात्र अजूनही खाली आला नसल्याचे विदारक चित्र तालुक्यात आहे. जलजीवन चे काम काही गावात चांगले झाले असेल ही पण बहुतांश गावात या योजनेचा बटयाबोळ झालेला दिसून येते. लोकप्रतिनिधींनी सरकार दरबारी आपले वजन वापरून कामे आणायची अन येथील अधिका-यांनी या कामाची वाट लावायची असा प्रकार तालुक्यात दिसून येत असल्याची खंत अनेकांनी व्यक्त केली.**

## संपादकीय

# पाकला धडा शिकवणार, कूटनीती की रणनीती

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला, तर अनेकजण गंभीर जखमी झाले. या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. हा हल्ला पाकिस्तानने त्यांच्या दहशतवाद्यांकडून करवून घेतला, याचे पुरावे भारतीय सुरक्षा यंत्रणांना पहलगाम परिसरामध्ये उपलब्ध झाले. पाकिस्तान या प्रकरणी हात झटकत असला तरी भारतात होत असलेले दहशतवादी हल्ले हे पाकपुरस्कृतच असल्याचे जगजाहीर आहे. पहलगाममध्ये पर्यटकांवर हल्ला झाल्याने जम्मू-काश्मीरच्या पर्यटनांवर परिणाम झाला आहे. नवविवाहित जोडपी हनीमूनसाठी जम्मू-काश्मीरमध्ये आलेली असताना, सुखी संसाराची स्वप्ने रंगवत असतानाच हा दहशतवादी हल्ला झाला आणि अनेकांच्या नवसंसाराची राखरांगोळी झाली. पहलगाममध्ये हल्ला होताच भारताच्या कॅबिनेट सुरक्षा समितीने काही निर्णय घेतले. त्यात १९६०चा सिंधू नदीच्या पाणी वाटपाचा करार तत्काळ प्रभावाने स्थगित करण्यात येईल, जोपर्यंत पाकिस्तान सीमेपलीकडच्या दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही तोपर्यंत ही स्थगिती लागू राहील. अटारी बॉर्डर तत्काळ प्रभावाने बंद करण्यात येईल. ज्या नागरिकांनी वैध कागदपत्रांच्या आधारे सीमा ओलांडली आहे त्या पाकिस्तानी नागरिकांना १ मे २०२५ पर्यंत यामार्गाने भारत सोडण्याचे आदेश. पाकिस्तानी नागरिकांना सार्क व्हिसा सूट योजना या योजनेखाली भारतात प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही. याआधी पाकिस्तानी नागरिकांना जारी केलेले कोणतेही व्हिसा रद्द मानले जातील. सध्या सार्क व्हिसा योजनेअंतर्गत भारतात असलेल्या कोणत्याही पाकिस्तानी नागरिकाला भारत सोडण्यासाठी ४८ तासांची मुदत देण्यात आली. नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षण/लष्करी, नौदल आणि हवाई सल्लागारांना 'पर्सना नॉन ग्राटा' घोषित करण्यात आले. त्यांना भारत सोडण्यासाठी एक आठवड्याची मुदत देण्यात आली. इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातून भारताच्या संरक्षण/नौदल/हवाई सल्लागारांना परत बोलावण्यात आले. संबंधित उच्चायोगांमधील ही पदे रद्द मानली जातात. दोन्ही उच्चायोगांमधून सेवा सल्लागारांचे पाच सहाय्यक कर्मचारी देखील काढून घेतले जातील. १ मे २०२५पर्यंत आणखी कपात करून उच्चायुक्तालयात काम करणाऱ्यांची संख्या ५५ वरून ३० पर्यंत कमी केली जाईल. पाकनेही त्यास तत्काळ प्रत्युत्तर देत तशाच स्वरुपाचे निर्णय घेतले. फक्त त्यात भारताशी तसेच भारताच्या माध्यमातून इतर देशांशी होणारा सर्व व्यापार त्वरित स्थगित केले, हा अतिरिक्त निर्णय घेतला. पहलगाम घटनेनंतर दोन्ही देशांवर युद्धाचे सावट आहे. पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह सातत्याने बैठका घेत आहेत. देश स्वातंत्र्य झाल्यापासून पाकिस्तान सातत्याने भारतविरोधी कुरापती करतच आहे. १९४७, १९६५, १९७१ या तीनही युद्धांमध्ये भारताने पाकिस्तानचा दणदणीत पराभव केला आहे. भारताशी उघडपणे युद्ध जिंकणे शक्य नसल्याने दहशतवाद्यांच्या माध्यमातून देशामध्ये गोळीबार, स्फोट, हल्ले घडवून आणणे, कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, भारताच्या चलनात बनावट नोटा घुसविणे अशा प्रकारातून भारताचे नुकसान करण्याचा पाकिस्तानचा उद्योग गेली ६८ वर्षे सातत्याने सुरूच आहे. २६/११चा सागरी मार्गाने झालेला हल्ला, कारगील युद्ध, आताचा पहलगामचा प्रकार असे हजारोंनी प्रकार पाकिस्तान करत असल्याने पाकिस्तानला कायमचाच धडा शिकविण्याची भाषा आज प्रत्येक भारतीयांकडून उघडपणे बोलली जात आहे. पाकविरोधी कारवाईसाठी सर्व राजकीय नेते व पक्षसंघटना एकवटल्या आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानबाबत निर्णय घेण्याचे व वेळ ठरविण्याचे स्वातंत्र्य भारताच्या तीनही संरक्षण दलाला दिले आहेत. या युद्धातून होणाऱ्या नुकसानीची झळ काही वर्षे दोन्ही देशांना सोसावी लागणार आहे. युद्ध झाले तरी चालेल, पण पाकिस्तानला ठेचलेच पाहिजे, पाकिस्तानच्या कारवायांना ठोस उत्तर दिले पाहिजे, असा सूर भारतीयांकडून आळविला जात असून केंद्र सरकारवर दिवसेंगणिक तसा दबावही वाढत चालला आहे. मुस्लीम राष्ट्रांनी पाकिस्तानला समर्थन द्यावे यासाठी त्यांच्याकडे याचना केली जात आहे. तुरुंगातील कैद्यांकडेही मदत मागण्याची वेळ पाकिस्तानच्या पंतप्रधानांवर आली आहे. भारताकडून संभाव्य हल्ल्याच्या भीतीनेच धीर खचलेल्या पाकिस्तानमध्ये आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. भारताने व पाकिस्तानने एकमेकांना हवाई हद्दीचा वापर करण्यास मनाई केल्याने या अकरा दिवसांमध्ये दोन्ही देशांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे व युद्धसदृश्य वातावरण लांबल्यास अजून मोठ्या प्रमाणावर दोघांचीही प्रचंड आर्थिक हानी होण्याची भीती आहे. भारताच्या कारवाईने घाबरलेल्या पाकिस्तानने पीओकेमधील १ हजारहून अधिक मदरसे बंद करण्याचे आदेश दिले आहेत. गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भारत मदरशांना दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे म्हणून लक्ष्य करेल या भीतीने १० दिवसांसाठी मदरसे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षेसाठी नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेजवळील संवेदनशील भागात पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. भारताने हल्ला केल्यास अन्न, औषधे आणि इतर आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी पूर्ण तयारी करण्यात आली आहे, असा दावा पीओके सरकारने केला आहे. आपत्कालीन निधीत एक अब्ज रुपये हस्तांतरित करण्यात आले आहेत. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव प्रचंड वाढला आहे. पाक अधिकाऱ्यांनी नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेजवळील इतर संवेदनशील भागात पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घातली. अनेक पर्यटकांना मार्बल चेकपोस्टवरून परत पाठवण्यात आले. लिपा व्हॅलीमधील रहिवाशांना नियंत्रण रेषेजवळ जाण्यास मनाई करण्यात आली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने घेतलेल्या कठोर निर्णयांमुळे पाकिस्तान अस्वस्थ झाला आहे. भारत हल्ला करेल याची पाकिस्तानला भीती वाटत आहे. दोन्ही देशांचे सैनिक सज्ज झाले आहेत. दोन्ही देशाचे सत्ताधारी युद्धाच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक देशांचा पाठिंबा मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. पाकिस्तान आर्थिक समीकरणात कंगाल झालेला असल्याने पाकिस्तानची बाजू घेऊन भारतासारखी बाजारपेठ गमविण्याचा धोका सहजासहजी कोणी स्विकारणार नाही. युद्धसदृश्य परिस्थितीमुळे सीमारेषेवर तणाव वाढला आहे. दोन्ही बाजूच्या कुरुक्षेत्रावर सैन्याची जमवाजमव झाली आहे. हवाई तसेच पाण्यातूनही लढाई लढण्याची चाचपणी सुरु झाली आहे. केवळ युद्धाचा बिगुल वाजण्याचीच दोन्हींकडून प्रतिक्षा सुरु आहे.

# नीट (UG) प्रवेश परीक्षा काळात प्रतिबंधीत वस्तुंच्या वापरावर प्रशासनाचे कडक लक्ष

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड दि. 3 मे:-** राष्ट्रीय परीक्षा एजेंसी नवी दिल्ली मार्फत आयोजीत नीट NEET (UG) प्रवेश परीक्षा नांदेड जिल्ह्यात आयोजीत करण्यात आली आहे. या परिक्षेसाठी जिल्ह्यात एकुण 56 केंद्र नियोजीत असून त्यापैकी नांदेड शहरात 46 केंद्र, मुदखेड तालुक्यात 4 केंद्र, नायगाव तालुक्यात 4 केंद्र व बिलोली तालुक्यात 2 केंद्रावर ही परीक्षा रविवार 4 मे 2025 रोजी नियोजीत आहे. नीट (UG) प्रवेश परीक्षाकरीता पात्र उमेदवारांनी रविवार 4 मे 2025 रोजी सकाळी 11 वाजेपर्यत पोहचण्याचे प्रयोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डीले नांदेड यांनी केले आहे.

परिक्षार्थी मार्फत कुठल्याही गैर मार्गांचा अवलंब परीक्षा काळात होऊ नये. जसे ईलेक्ट्रोनीक उपकरणांचा, ब्लुटूथचा वापर आळा बसणे अनुषंगाने परिक्षार्थी यांची परीक्षा केंद्रावर वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत कान, नाक, घसा संबंधाने तज्ज्ञांकडून तपासणी केली जाणार आहे. उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत नीट NEET (UG) प्रवेश परीक्षा केंद्रामध्ये पुढील वस्तू घेऊन जाण्याची परवानगी नसणार आहे. उमेदवाराने आणलेल्या कोणत्याही वस्तूच्या सुरक्षिततेसाठी परीक्षा केंद्र जबाबदार नसेल. मजकूर साहित्य (मुद्रित किंवा लिखित), कागदाचे तुकडे, भूमिती/पेन्सिल बॉक्स, प्लास्टिक पाउच, कॅल्क्युलेटर, स्केल, लेखनपॅड, पेनड्राइव्ह, इरेजर, कॅल्क्युलेटर, लॉगटेबल, इलेक्ट्रॉनिक पेन, स्कॅनर इत्यादी कोणतीही स्टेशनरी वस्तु उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर आणू नयेत.

नीट NEET (UG) प्रवेश परीक्षा केंद्रावर ड्रेसकोड संदर्भाने दिलेले निर्देशांचे तंतोतंत पालन करणे परिक्षार्थी यांना क्रमप्राप्त आहे. जसे वजनाने भारी असलेला पोषाख, फुलबाहीचा शर्ट प्रतिबंधीत असून सांस्कृतिक व पारंपारीक पोषाखासंदर्भाने तपासणी (फ्रिसकींग) संदर्भाने, परिक्षेच्या दिवशी सकाळी 11.30 वाजेच्या अगोदर परीक्षा केंद्रावरील यंत्रणेकडून तपासणी करुन घ्यावी. मोबाईल फोन, ब्लूटूथ, इअरफोन, मायक्रोफोन, पेजर, हेल्थ बँड इ. सारखे कोणतेही संप्रेषण साधन परीक्षा केंद्रावर आणण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच इतर वस्तू जसे वॉलेट, गॉगल, हँडबॅग, बेल्ट, कॅप इत्यादी कोणतेही घड्याळ, मनगटी घड्याळ, ब्रेसलेट, कॅमेरा इ. कोणतेही दागिने, कोणताही खाण्यायोग्य पदार्थ उघडलेला किंवा पॅक केलेला इत्यादी, तसेच कोणत्याही लपवून आणण्या जोग्या मायक्रोचिप, कॅमेरा, ब्लूटूथ उपकरण इत्यादी संप्रेषण साधने, इतर कोणतीही वस्तू जी अनुचित साधनांसाठी वापरली जाऊ शकतात, त्या सर्व प्रतिबंधीत करण्यात आल्या आहेत. जर कोणत्याही उमेदवाराकडे, परीक्षा केंद्रात नमुद प्रतिबंधित वस्तू आढळून आल्यास तो अनुचित साधनांचा वापर मानला जाईल आणि कायद्यान्वये संबंधित तरतुदींनुसार उमेदवारावर कारवाई केली जाईल, याची सर्व परिक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय मदत कक्षाचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**



**नांदेड, दि.1 एप्रिल -** मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालयांमार्फत नागरिकांना द्यावयाच्या मदतीसाठी कार्य करणाऱ्या जिल्हास्तरीय मदत कक्षाचे आज राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धाविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रशिक्षण भवनच्या इमारतीत हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार रविंद्र चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार जितेश अंतापूरकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, अपर जिल्हाधिकारी पी.एस.बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, यांच्यासह आरोग्य विभागाचे व जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाद्वारे रुग्णांना वैद्यकीय उपचाराकरीता अर्थसहाय्य सहज उपलब्ध व्हावे, नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या प्रकरणाची माहिती आपल्याच जिल्ह्यात व्हावी तसेच नागरिकांच्या पैशाचा व वेळेचा अपव्यव टाळण्यासाठी हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

# मराठी भाषा विभागाकडून 'अभिजात मराठी' या आगामी ओटीटी प्लॅटफॉर्मची घोषणा; उदय सामंत यांच्या हस्ते लोगो लाँच!

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**



**लातूर –** महायुती सरकारच्या अथक प्रयत्नांना दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ यश मिळाल्यामुळे आपल्या मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाला. या गौरवाच्या प्रेरणेतून,१ मे २०२५ रोजी मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर येथे 'राजभाषा मराठी दिन विशेष कार्यक्रम' पार पडला. या कार्यक्रमात मा. मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत'अभिजात मराठी' या नव्या ओटीटी प्लॅटफॉर्मचा लोगो आणि घोषणा करण्यात आली.

ए आय आणि ग्लोबल कंटेंटच्या युगातही आपली मायबोली अभिमानाने उभी राहावी — यासाठी सुमन एंटरटेनमेंटने 'अभिजात मराठी' या ओटीटी प्लॅटफॉर्मचा संकल्प केला आहे. सध्या अनेक मराठी कलाकृतींना प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्मवर कमी प्राधान्य दिलं जातं. 'अभिजात मराठी' हे त्यावर एक सशक्त आणि हक्काचं उत्तर ठरणार आहे.

जगभरातील सुमारे २० कोटी मराठी भाषिक प्रेक्षकांना एकत्र जोडण्यासाठी 'अभिजात मराठी' हे व्यासपीठ उभं राहत आहे. ही केवळ एक ओटीटी सेवा नाही, तर भाषेचा सन्मान आणि मराठी निर्मात्यांसाठी नवा श्वास ठरणार आहे.

मा. मंत्री डॉ. उदय सामंत, आपल्या भाषणात म्हणाले ,"मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म ही आता काळाची आणि भाषेची गरज बनली आहे.मराठी भाषेचं सामर्थ्य, तिचं जतन, प्रचार आणि प्रसार — हेच आमचं ब्रीदवाक्य आहे.

आज मोबाइल हातात आल्यावर आपण दररोज १-२ चित्रपट हेडफोन लावून पाहतो.जर 'अभिजात मराठी' सारखा मराठीचा स्वतंत्र ओटीटी प्लॅटफॉर्म प्रत्येकाच्या हातात असेल, तर त्यातून मराठी भाषेचं संवर्धन, प्रचार आणि उत्तम साहित्य पुढच्या पिढीपर्यंत पोहोचू शकतं. म्हणूनच हे व्यासपीठ अत्यावश्यक आणि अत्यंत काळानुरूप आहे."

'अभिजात मराठी' हे ओटीटी व्यासपीठ पूर्णपणे मोफत स्वरूपात प्रेक्षकांसाठी उपलब्ध असणार आहे. यावर दर्जेदार मराठी चित्रपट, वेबसीरिज आणि लघुपटांचा समृद्ध संग्रह प्रेक्षकांना पाहायला मिळेल. याव्यतिरिक्त, इतर भारतीय भाषांतील निवडक चित्रपट मराठीत डब करून सादर करण्यात येणार आहेत, जेणेकरून भाषेची अडचण न वाटता सर्वांना दर्जेदार आशयाचा आनंद घेता येईल. तसेच, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आशयासोबत मराठी सबटायटल्स देण्यात येणार आहेत, ज्यामुळे जागतिक कंटेंटही मायबोलीत अनुभवता येणार आहे.

'अभिजात मराठी' चे संस्थापक केदार जोशी ह्यांनी सांगितले "'अभिजात मराठी' केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नाही, ती आपल्या भाषेची, आपल्या अस्मितेची, आणि आपल्या संस्कृतीची डिजिटल चळवळ आहे. ही भाषा जगायची आहे, टिकवायची आहे — म्हणून हे व्यासपीठ आम्ही निर्माण करतोय !"

'अभिजात मराठी' ओटीटीचा सॉफ्ट लॉन्च जुलै २०२५ मध्ये होणार असून, तो १,००० निवडक प्रेक्षकांसाठी खास प्रिव्ह्यू स्वरूपात असेल. त्यानंतर, ऑक्टोबर २०२५ मध्ये मराठी भाषा आठवड्याच्या निमित्ताने या प्लॅटफॉर्मचा अधिकृत भव्य लॉन्च करण्यात येणार आहे. हा टप्पा मराठी प्रेक्षकांसाठी आणि संपूर्ण इंडस्ट्रीसाठी एक ऐतिहासिक क्षण ठरेल.

सर्व प्रकारच्या मराठी कंटेंटसाठी खुले आवाहन: 'अभिजात मराठी' या व्यासपीठावर प्रसारित होण्यासाठी आपल्या दर्जेदार मराठी कलाकृतींचं स्वागत करण्यात येत आहे. हे व्यासपीठ प्रामुख्याने चित्रपट, वेबसीरिज आणि लघुपट यांसारख्या विविध प्रकारच्या कंटेंटसाठी खुले असून, नवोदित आणि अनुभवी निर्मात्यांना एक नवी संधी देण्यासाठी तयार आहे.

कंटेंट पाठवण्यासाठी तुम्ही खाली दिलेल्या ई-मेल वर संपर्क करू शकता टीप कृपया तुमचं संपूर्ण प्रोफाइल व कंटेंट लिंक्ससहित सबमिट करावं.

"आपली भाषा, आपली संस्कृती आणि आपला अभिमान 'अभिजात मराठी'सोबत आता संपूर्ण जगभर झळकणार!"

१ मे २०२५ रोजी या उपक्रमाची केवळ अधिकृत घोषणा करण्यात आली आहे मात्र लवकरच 'अभिजात मराठी' ओटीटी प्लॅटफॉर्म आपल्या मायबोलीसाठी एक भक्कम जागतिक व्यासपीठ ठरेल, जिथून मराठीची श्रीमंती, संस्कृती आणि प्रतिभा अखंड जगभर झळकणार आहे!

# मुकेश अंबानींची मोठी भविष्यवाणी! पहलगाम हल्ल्यावर PM मोदींसमोर केलं मोठं विधान

**मुंबई/प्रतिनिधी -** भारताला मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राचं आंतरराष्ट्रीय केंद्रबिंदू होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही असं रिलायन्सचे चेअरमन मुकेश अंबानी यांनी म्हटलं आहे. आपला कंटेंट, लोकसंख्या आणि तंत्रज्ञानाच्या आधेर भारत लवकरच या क्षेत्रात मक्तेदारी करेल असंही ते म्हणाले आहेत. मुकेश अंबानी मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटरमध्ये आयोजित वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट (WAVES) 2025 मध्ये बोलत होते. पुढील दशकापर्यंत भारतीय मीडिया आणि मनोरंजन क्षेत्र चारपटींनी वाढ नोंदवेल असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला आहे. म्हणजेच 100 अरब डॉलरपेक्षा मोठा आकडा गाठू शकतो. सध्या मार्केट 28 अरब डॉलर्सचं आहे.

मुकेश अंबानी यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींचं कौतुक केलं. मोदीजींच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारत एक आघाडीचा डिजिटल राष्ट्र बनला आहे. कथा सांगण्याची शैली आणि डिजिटल तंत्रज्ञान यांच्या संगमामुळे भारताच्या मनोरंजन आणि सांस्कृतिक प्रभाव जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचत आहे. एआय आणि इमर्सिव्ह तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कथा पूर्वीपेक्षा अधिक आकर्षक बनवू शकतात. तसंच ते विविध भाषा, देश आणि संस्कृतींमधील प्रेक्षकांपर्यंत लवकरात लवकर पोहोचू शकतात. मला विश्वास आहे की भारतातील अति-प्रतिभावान तरुण जागतिक मनोरंजन क्षेत्रावर राज्य करतील.



मनोरंजनाचं जागतिक केंद्र आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा उल्लेख करत ते म्हणालेकी, "AI आता मनोरंजनासाठी ते करत आहे, जे 100 वर्षांपूर्वी सायलेंट कॅमेराने केलं होतं. तेदेखील लाखपटीने उत्तम असेल. जगातील लोक मागील 5 हजार वर्षांपासून गोष्टी ऐकत आहे. कंटेंट आणि लोकसंख्येनंतर भारताची तिसरी ताकद तंत्रज्ञान आहे. भारतात 1.2 बिलियन मोबाईल फोन युजर्स आहेत. याचा अर्थ 1.2 बिलियन स्क्रीन आहेत, ज्यांचा उपयोग मनोरंजनासाठी केला जाऊ शकतो. जिओने हाय-स्पीड इंटरनेट डेटा परवडणारा बनवून भारतातील डिजिटल आणि मनोरंजन क्रांतीचा पाया रचला आहे. 5G वर बांधलेली आमची जागतिक दर्जाची डिजिटल पायाभूत सुविधा लवकरच 6G पर्यंत वाढवली जाईल."

मुकेश अंबानी पुढे म्हणाले की, "आम्ही जागतिक स्तरावर मनोरंजन क्षेत्रातील दिग्गजांची बरोबरी करण्याच्या आणि त्यांच्या पुढे जाण्याच्या महत्त्वाकांक्षेने जियोहॉटची सुरुवात केली आहे. हे भारत आणि परदेशातील सर्वोत्तम प्रतिभांना एक व्यासपीठ उभारत आहे. आम्ही प्रेक्षकांच्या संख्येचे रेकॉर्ड तोडले आहेत, आयपी स्ट्रीमिंगमध्ये क्रांती घडवली आहे आणि इमर्सिव्ह, बहुभाषिक, इंटरॲक्टिव्ह क्रीडा दृश्यांचे जागतिक मानक देखील बदलले आहेत. आणि ही फक्त सुरुवात आहे. डिस्नेसोबत जिओची भागीदारी डिजिटल स्टोरी-टेलिंगमध्ये एका नवीन युगाची सुरुवात आहे."

पहलगाम हल्ल्यावरही बोलले मुकेश अंबानी

त्यांनी सांगितलं की, "वेव्ह्स इनोव्हेशन, संस्कृति आणि सहयोगाचा आंतरराष्ट्रीय केंद्रबिंदू होण्यास तयार आहे. आपला 5 हजारांहून अधिक वर्षांचा इतिहास आहे. आपल्याकडे गोष्टी, कथांचा मोठा खजिना आहे. रामायण आणि महाभारतापासून आपल्याकडे डझनभर भाषांमध्ये लोककथा आणि क्लासिक्स आहेत. यामध्ये मूल्य, बंधूता, शौर्य, प्रेम आणि सुंदरता आहे जे जगभरातील लोकांच्या मनाला स्पर्श करतात. कोणताही देश भारताच्या कथा सांगण्याच्या ताकदीला स्पर्धा देऊ शखत नाही".

पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत ते म्हणाले की, "आम्ही सर्व पीडित कुटुबांप्रती संवेदना व्यक्त करतो. इतक्या कठीण काळातही पंतप्रधानांनी येथे येणं देशासाठी संदेश आहे. मोदीजी शांतता, न्याय आणि माणुसकीच्या शत्रूंविरोधातील या लढाईत तुम्हाला 145 कोटी भारतीयाचं समर्थन आहे. भारताचा विजय निश्चित आहे".

# धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांना " लोकशाही मराठवाडा रत्न " पुरस्कार

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** वर्षभरात 365 दिवस चालणाऱ्या तीन उपक्रमासह एकूण 90 उपक्रम चालवून समाजसेवेचा एक आगळावेगळा पायंडा पाडणारे धर्मभूषण ऍड.दिलीप ठाकूर यांना ' लोकशाही' या महाराष्टातील अग्रगण्य मराठी न्यूज चॅनेल तर्फे रविवार दि. 4 मे रोजी छ.संभाजीनगर येथे " लोकशाही मराठवाडा रत्न " पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असून त्यांच्या पुरस्काराचे शतक पूर्ण होत असल्यामुळे त्यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

छ.संभाजीनगर चिकलठाणा विमानतळा जवळील पंचतारंकित हयात पॅलेस च्या सभागृहात सकाळी 10 वाजता मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. 22 वर्षात 13 लाखापेक्षा जास्त रुग्णांना भाऊचा डबा तसेच लायन्सचा डबा , 57 महिण्यापासून अडीच हजारापेक्षा जास्त भ्रमिष्ट्रांची कटिंग दाढी करुन स्नान घालून नवीन कपडे देऊन करण्यात आलेला कायापालट, गेल्या 6 वर्ष्यापासून जितके वर्ष असेल तितक्या संख्येत हिवाळ्यात ब्लँकेट वाटपाची मायेची उब , पावसाळ्यात छत्री वाटपाचे कृपा छत्र आणि उन्हाळ्यात चपला वाटप करण्याची चरणसेवा करणारे धर्मभूषण ऍड.दिलीप ठाकूर एक



नव्हे दोन नव्हे तर वर्षभरात तब्बल 90 जगावेगळे उपक्रम राबवितात.त्यामध्ये भाऊचा माणुसकीचा फ्रिज, क्षुधा शांती, लायन्सचा डबा हे 3 उपक्रम तर वर्षभरातील 365 दिवस अखंडीत पणे सुरु आहेत.

अशा या ध्येयवेडा समाजसेवकाला आतापर्यंत देशभरातून 99 पुरस्कार मिळवलेले आहेत.त्यामध्ये धर्मभूषण पदवी,गुरुवर्य पांडुरंगराव पुंडे स्मृति पुरस्कार,लायंस एप्रिसिएशन अवार्ड,महाराष्ट्र रत्न, मराठवाडा भूषण, शान ए नांदेड,देवदूत उपाधी,कर्मयोगी पुरस्कार,नांदेड के सांता,इन्स्पायर पर्सनॅलिटी अवॉर्ड,ज्योतिष्य महर्षी पाराशर स्मृती पुरस्कार, गुनिजन गौरव पुरस्कार,  सन्मान पुरस्कार, कार्य गौरव पुरस्कार, बेस्ट सिग्नेचर ऍक्टिव्हिटी, कोरोना सेवा योद्धा पुरस्कार, इंटरनॅशनल ह्यूमन राइट्स कमिशन नॅशनल अवार्ड,तिरंगा गौरव पुरस्कार,अखंड सेवावृत्ती पुरस्कार,कोरोना योद्धा, कार्य सन्मान पुरस्कार, कोरोना योद्धा सन्मान, दिनबंधू सेवा पुरस्कार, कोविड योद्धा, समाजभूषण पुरस्कार,  अन्नपूर्णा प्रेरणा रत्न पुरस्कार,  आदर्श शिवसैनिक पुरस्कार, राजपूत भूषण पुरस्कार, मा जिजाऊ रत्न पुरस्कार, समाज विभूषण पुरस्कार, राजे छत्रपती शिवाजी सेवाभावी पुरस्कार, मातोश्री गंगुबाई पुरस्कार, जीवन साधना पुरस्कार, भगत नामदेव लाइफटाइम अचीवमेंट पुरस्कार, रेअर अवॉर्ड, कानडा राजा पंढरीचा राष्ट्रीय अनुग्रह पुरस्कार, लायन्स बेस्ट प्रोजेक्ट इंटरनॅशनल अवॉर्ड, सेवा सादगी सदाचार पुरस्कार, मानवता रक्षक पुरस्कार, ऊर्जा गौरव पुरस्कार, कार्य अभिमान पुरस्कार, कृतज्ञता सेवा पुरस्कार, राजरत्न पुरस्कार, संवेदनशील सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार, कृतज्ञता उत्सव,मानवता के सेवक पुरस्कार, कोरोना योद्धा गौरव ,इंटरनॅशनल इन्स्पायरिंग आयकॉन अवॉर्ड, आज का कर्मवीर , शिवरत्न पुरस्कार ,संवेदना राष्ट्रीय पुरस्कार, नंदिग्राम एक्सलन्स नॅशनल अवॉर्ड यासारख्या पुरस्कारांनी देशभरातील विविध संस्थांनी गौरव केलेला आहे. पुरस्काराची संख्या शंभर होत असल्यामुळे अनेकांनी अभिनंदन केले आहे.



## जिल्ह्यातील ५६ केंद्रावर २० हजार विद्यार्थी देणार नीटची परीक्षा

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड, दि. ३ मे:-** नीट 2025 ही परीक्षा 4 मे 2025 रोजी नांदेड जिल्ह्यामध्ये 56 परीक्षा केंद्रांवर घेतल्या जाणार आहे. या परीक्षेसाठी 56 केंद्र संचालक व 56 निरीक्षक नेमण्यात आलेले आहेत, पर्यवेक्षणासाठी प्रत्येक कक्षामध्ये दोन पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे, एका परीक्षा कक्षामध्ये 24 विद्यार्थी असतील. नांदेड शहराच्या जवळपास 40 किलोमीटरच्या परीक्षेतील शाळा या परीक्षा केंद्र म्हणून घेण्यात आलेल्या आहेत. प्रश्नपत्रिका कस्टडी मधून घेतल्यापासून ते परीक्षा केंद्रावर निर्धारित वेळेत पेटीचे सील तोडेपर्यंत त्यावर जीपीएस ने NTA मार्फत लक्ष ठेवण्यात येणार आहे. सर्व परीक्षा केंद्र वर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांना सकाळी 11 पासून रिपोर्टिंग करावयाचे आहे. परीक्षेची वेळ दुपारी दोन ते पाच ही राहील. विद्यार्थ्यांनी हॉल तिकीट वर दिलेल्या सूचनेनुसार सोबत फोटो न्यायचे आहेत. इतर कोणतीही साहित्य परीक्षा केंद्रात नेता येणार नाही, पेन पेन्सिल सुद्धा तेथेच पुरवल्या जाईल, भारतातील सर्वात जास्त परीक्षार्थी असणाऱ्या जिल्ह्यांपैकी नांदेड जिल्हा एक आहे, जवळपास 20 हजार विद्यार्थी नांदेड जिल्ह्यामध्ये परीक्षा देणार आहेत. जिल्हाधिकारी मार्फत सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरामध्ये जमावबंदी आदेश लागू करण्यात आलेले आहेत. सदरील परीक्षेसाठी एक डिस्ट्रिक्ट कोऑर्डिनेटर व चार सिटी कॉर्डिनेटरची एनटीएमार्फत नेमणूक करण्यात आलेली आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शाखा नांदेडच्या नियुक्त्या जाहीर

## कार्याध्यक्षपदी रामेश्वर काकडे तर जिल्हा सरचिटणीस पदी बापूसाहेब पाटील

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड / दत्ता पाटील गोजेगावकर**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा नांदेड अंतर्गत जिल्हा कार्याध्यक्षपदी सकाळचे जिल्हा प्रतिनिधी रामेश्वर काकडे तर सरचिटणीस पदी मराठी अपडेटचे संपादक बापूसाहेब पाटील यांची सर्वानुमते निवड जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी इतरही पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संघटक संजय भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, राज्य समन्वयक नितीन शिंदे



यांच्या आदेशान्वये तर प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे डॉ अभय कुमार दांडगे यांच्या सूचनेवरून नांदेड जिल्हाची उर्वरित कार्यकारणी हॉटेल विसावा येथे घेतलेल्या बैठकीत सर्वांनुमते निश्चित करून जाहीर करण्यात आली.

यामध्ये प्रामुख्याने पत्रकार संघाच्या नांदेड जिल्हा कार्याध्यक्षपदी दैनिक सकाळचे जिल्हा प्रतिनिधी रामेश्वर काकडे तर सरचिटणीस पदे मराठी अपडेटचे संपादक बापूसाहेब पाटील यांची निवड निश्चित करण्यात आली.

**या निवडीसह जिल्हा उपाध्यक्षपदी दैनिक सत्य मराठीचे संपादक आयुब पठाण, महानगर सचिवपदी सकाळचे गौरव वाळिंबे यांची निवड करण्यात आली.सदरील निवडीचे नियुक्तीपत्र जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे आणि लक्ष्मीकांत मुळे यांच्यासह जिल्हा पदाधिकारी यांच्या शुभ हस्ते देण्यात आले. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.**

# श्री रामप्रताप मालपाणी मूकबधिर विद्यालयात गुरु-मित्रांचा कृतज्ञता सोहळा उत्साहात

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** येथील श्री रामप्रताप मालपानी मूकबधिर विद्यालयात गुरु व माजी विद्यार्थी मित्रांचा अनोखा कृतज्ञता सोहळा नुकताच उत्साहाच्या वातावरणात साजरा झाला

**आपल्या शाळेचा महत्वपूर्ण वाटा असल्याचे त्यांनी अधोरेखीत केले आहे. संस्थेचे कौतुक करुन गुरुला आणि विद्यार्थ्यांना जोडण्याचे काम या कृतज्ञता सोहळयाने केल्यामुळे अनेक माजी विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे.या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन मुरलीधर गोडबोले  यांनी केले.**

आहे.

विशेषतः राज्यभरातून तिनशे माजी विद्यार्थ्यांनी गेटटुगेदरचा विक्रम संपादन करुन गुरुमित्राचे  अनोखे नाते दृढ केले





आहे.

या कृतज्ञता सोहळयासाठी डॉ.लक्ष्मीकांत बजाज, पुनम राजेश पवार, विजय मालपाणी, भद्रीनारायण मंत्री,कुणाल मालपाणी, चिरंजीवी लाल दागडिया, सौ. अरुणा कुसुम, सतीश मुरकुंदे, महेश पतंगे,अभय कौलास्कर,जयंत हटकर,चंद्रकांत धुमाळ, आशा रावणगावे, रमाकांत गजभारे, श्रीधररेडडी आलुरवाड तृप्ती पतंगे,वसतीगृह अधीक्षक संजय शिंदे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. विशेषतः या अनोख्या उपक्रमास राज्यभरातून जवळपास 300 माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या भावना कथन केल्या आहेत.

विशेषतः या सोहळयामध्ये बेरोजगार युवकांनी, अविवाहित मुला-मुलींनी नोंदणी केली. आणि कार्यक्रमास प्रतिसाद दर्शविला. दरम्यान माजी विद्यार्थी अनेक शासकीय आणि निमशासकीय कार्यरत असून त्यांनी यावेळी आपापले अनुभव कथन केले आहेत.

## अंबिका कॉलनी सोमनाथपूर येथे महात्मा बसवेश्वर जयंती साजरी



**उदगीर -** सोमनाथपूर येथील अंबिका कॉलनी येथे महात्मा बसवेश्वरांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष सोमनाथपूरचे उपसरपंच श्री अमित माडे हे होते, तर प्रमुख पाहुणे श्री संग्राम सोमवंशी हे होते.

या कार्यक्रमास  ज्येष्ठ नागरिक श्री  मसगले आप्पा, श्री स्वामी, श्री राजू एकदरे ,श्री क्षितिज जावळे सौ.मजगले ताई व कॉलनीतील इतर महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.सुरेश लांडगे यांनी केले.

# कामगार दिनानिमित्त कपिल वाघमारे यांना गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड / संदिप पिल्लेवाड**

दिनांक १ मे रोजी महाराष्ट्र कामगार दिनानिमित्त दरवर्षी महाराष्ट्र वीज वितरण मार्फत गुणवंत पुरस्कार प्रदान करण्यात येतो सदरील पुरस्कारासाठी तालुक्यातून एका कर्मचाऱ्याची निवड केली जाते, या वर्षीचा गुणवंत कामगार पुरस्कार हा मुखेड उपविभागांतर्गत मुखेड शहर शाखेत कार्यरत असणारे तंत्रज्ञ  कपील शाहाजी वाघमारे यांना देण्यात आला, नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री राजाराम माने साहेब यांच्या हस्ते त्यांना गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित करण्यात



आले.

यावेळी नांदेड मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री सुधाकर जाधव साहेब तसेच परिमंडळ कार्यालय व मंडळ कार्यालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्री कपील वाघमारे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल महावितरण उपविभागीय कार्यकारी अभियंता श्री पटवेकर, मुखेड शहर शाखा अभियंता श्री राठोड, शाखा अभियंता श्री नरोटे, ढगे, कार्यालयीन कर्मचारी मोईन शेख, पातळे, तसेच कंदूरके, दारकू व उपविभागातील सर्व कर्मचारी यांनी शुभेच्छा दिले.

## माळी सेवा संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी पद्माताई गिऱ्हे यांची निवड

**श्रीक्षेत्र माहूर**



माहूर शहरासह जिल्हाभर आपल्या सामाजिक कार्यामुळे प्रसिद्ध असलेल्या माहूर शहरातील रणरागिणी सौ पद्माताई जयंत  गिऱ्हे यांची माळी सेवा संघाच्या महिला आघाडीच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांना पुणे येथील कार्यक्रमात नियुक्तीपत्र देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्याने माहूर शहरासह नांदेड जिल्हा भरातून त्यांचे अभिनंदन होत आहे

माळी सेवा संघ महाराष्ट्र राज्य प्रदेश  कार्यकारणी 25 एप्रिल रोजी दत्ताभाऊ माळी यांनी जाहीर केली संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये माळी सेवा संघ म्हणून कार्यरत असणारी माळी समाजाची अग्रगण्य संघटणा असून या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ माळी असून त्यांनी प्रदेश कार्यकारणी महाराष्ट्र राज्य जाहीर केली असून माळी सेवा संघ ही संघटना प्रत्येक तीन वर्षानंतर बदलण्यात येते माळी सेवा संघाच्या आधारस्तंभ रुपालीताई चाकणकर अध्यक्ष महाराष्ट्र राज्य महिलाआयोग राज्यमंत्री दर्जा यांच्यामार्गदर्शनात व माळी सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ माळी यांनी समाजातील कामाची दखल घेत कामाचा लेखाजोखा  घेऊन  पुणे येथे एका कार्यक्रमात नियुक्तीपत्र देण्यात आले.

हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व संपादक **डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **सतिश विजय सोनवणे** यांच्या **यश प्रिंटर्स अँड पब्लिकेशन शिवाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड (महाराष्ट्र) – ४३१६०२** येथे प्रकाशित केले.
E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya,** Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **SATISH VIJAY SONWANE**. Printed at **YASH PRINTERS & PUBLICATION HOUSE NO, 1-2-211, SHIVAJI NAGAR, NANDED**, Tq. Dist. **NANDED**, (Maharashtra) - 431602 M.S. & Published Near **AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715**
Email : shramiklokrajya@gmail.com

# उपविभागीय अधिकारी अनुप पाटील व तहसिलदार राजेश जाधव यांनी लेंडी पुनर्वसनातील नागरीकांच्या अडीअडणी घेतल्या जाणून

## हसनाळ प.मु. भाटापुर पदे, भासवाडी,रावणगांव,भिंगोली मध्ये बैठका; नागरिकांनी केले समाधान व्यक्त

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**मुखेड / ज्ञानेश्वर डोईजड**





जिल्हाधिकारी कार्यालयात आमदार डॉ. तुषार राठोड व जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दि. 02 मे 2025 रोजी घेतलेल्या बैठकीच्या अनुषंगाने व जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मुखेड तालुक्यातील हसनाळ प.मु. भाटापुर पदे भासवाडी,रावणगांव,भिंगोली या लेंडी पुनर्वसनाच्या प्रत्यक्ष गावात देगलुरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील व मुखेडचे तहसिलदार राजेश जाधव यांनी दि. 03 मे 2025 रोजी येथील नागरीकांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

लेंडी पुर्नवसनच्या गावांना भेटी दरम्यान या गावातील नागरीकांसोबत संवाद करुन त्यांच्या नेमक्या समस्या काय आहेत. सद्यपरिस्थितीची प्रत्यक्ष जाऊन पाहणी करुन नागरीकांच्या भावना सुध्दा अधिका-यांनी समजून घेतल्याने गावातील नागरीकांनी समाधान व्यक्त केले.

हसनाळ प.मु. भाटापुर पदे भासवाडी,रावणगांव,भिंगोली येथील लेंडी पुनर्वसनातील नागरीकांनी स्थलांतर भत्ता, राहिलेली 6.75 लाख रक्कम , अविवाहीत मुलींसाठी शासन स्तरावर मदत व विवाहीत झालेल्या मुलांच्या वारसासाठी मदत, पाण्याचा प्रश्न , लाईटचा प्रश्न, रस्ते,प्लॉट, सानुग्रह अनुदान,मावेजा, अशा विविध मागण्या प्रशासनासमोर ठेवल्या. यात राहिलेली 6.75 लाख रक्कम सहा महिण्यात देण्याचे प्रशासनाने मान्य केले. यात अनेक प्रश्न तात्काळ जागेवर सोडविण्यात आले तर विविध मागण्या शासन स्तरावरील असल्याने पाठपुरावा करु असे सांगितल्याने येथील नागरीकांनी सुध्दा घेण्यात आलेल्या बैठकीत समाधान व्यक्त केले.

**या बैठकीला उपविभागीय अधिकारी अनुप पाटील व तहसिलदार राजेश जाधव यांच्यासह मुक्रमाबादचे सहाय्यक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके, लेंडीचे कार्यकारी अभियंता तिडके, विज वितरण अधिकारी व विविध विभागातील कर्मचारी, गावातील नागरीक मोठया संख्स्येने उपस्थित होते.**

---

## नांदेड पोलीस विभागामार्फत ३ हजार ५०० बेरोजगार उमेदवारांना नियुक्ती पत्र



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** नांदेड जिल्हा पोलिस दलाच्या वतीने मिशन उडान या अभियानांतर्गत दि. ०३ मे २०२५ रोजी सुशिक्षित बेरोजगारांना उमेदवाराना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन पोलिस कवायत मैदान, वजीराबाद नांदेड येथील मैदानावर करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात जवळपास ११ हजार सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल अशी अपेक्षा जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी व्यक्त केली. आतापर्यंत जवळपास ३५०० उमेदवारांना नियुक्ती पत्र दिले असल्याचे त्यानी सांगितले.

## नीट" परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**


**नांदेड दि. 3 मे :-** "नीट परीक्षा 2025" ही रविवार 4 मे 2025 रोजी दुपारी 2 ते संध्याकाळी 6 या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील एकूण 56 परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्राच्या शंभर मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे. परीक्षा केंद्राच्या परिसरात रविवार 4 मे 2025 रोजी दुपारी 12 वाजेपासून ते रात्री 8 वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच यावेळेत परीक्षा केंद्राच्या परिसरातील शंभर मीटर पर्यंतच्या सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास प्रतिबंध राहील, असे जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी कळविले आहे.

---

# नांदेड ते माऊली बस सेवा पुन्हा सुरू करा - साईलिला पाटील यांची मागणी

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड :** तालुक्यातील माऊली,उच्चा,बेटमोगरा,टाकळी,



धुप्पा नरसी मार्गे नांदेडकडे जाणारी एस .टी महामंडळाची बस सेवा गेल्या काही दिवसांपासून बंद आहे.या मार्गावरील बंद असलेली बस सेवा पुन्हा सुरू करून या मार्गावरील विद्यार्थी,महिला,शेतकरी व सर्वसामान्य नागारिकांना दिलासा द्यावा अशी मागणी साईलिला संदीप पाटील माऊलीकर यांनी एका निवेदनाद्वारे खा.रविद्र चव्हाण यांच्याकडे केली आहे.

विशेष म्हणजे पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन खा.चव्हाण यांनी नांदेड- नरसी- माऊली -एकलार ही बस तत्काळ सुरू करण्याबाबत विभागीय नियंत्रक नांदेड यांच्या नावे पत्र दिले आहे.

माऊली सह आसपासच्या गावातील महिला,नागरीक व विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.विशेष म्हणजे माऊली,उच्चा,बेटमोगरा या सह आसपासच्या अनेक गावातील शेकडो शाळकरी मुलं- मुली शंकरनगर,नायगाव व देगलुर येथे शिक्षणासाठी रोज जाने येणे करतात.मात्र या मार्गावरील एस.टी बस सेवा बंद झाली असल्यामुळे विद्यार्थी,शेतकरी,कामगार,माहिला व वृद्धांना जिव धोक्यात घालून खाजगी प्रवासी वाहनांने प्रवास करावा लागत आहे. एस.टी बस अभावी प्रवाशांना होणारी अडचण लक्षात घेऊन प्रशासनानी नांदेड-माऊली,मुखेड-बेटमोगरा-माऊली- देगलुर ही बस सेवा पुन्हा सुरु करा अशी मागणी मुखेड पंचायत समितीचे माजी सभापती तथा जेष्ठ नेते स्व.मष्णाजीराव पा.माऊलीकर यांच्या नातसुन सौ.साईलिला संदिप पा.माऊलीकर यांनी एका निवेदनाद्वारे खा.रविद्र चव्हाण यांच्याकडे केली आहे.

**साईलिला पाटील यांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन खा.रविद्र चव्हाण यांनी विभागीय नियंत्रक यांच्या नावे दिलेल्या पत्रानंतर लवकरच नांदेड-नरसी-बेटमोगरा-माऊली ते एकलार पर्यंत एस.टी महामंडळाची बस सुरू होण्याची आस निर्माण झाली असून सदरची बस सुरू झाल्यास या मार्गावरील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.**

---

# सामाजिक उपक्रमातुन केला वाढदिवस साजरा

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**बिलोली -** भारतीय जनता पार्टीच्या बिलोली मंडळाचे नवनिर्वाचीत अध्यक्ष अध्यक्ष इंद्रजित यादवराव तुडमे यांच्या वाढदिवसा निमित्त नविन बसस्थानक परिसरात वृक्ष लागवड व उप जिल्हा रुग्णालय येथे फळ वाटप तसेच मागास समाज फासे पारधी समाजातील महिलांना साडी चोळी वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमातुन वाढदिवस साजरा करण्यात आला

सामाजिक ,सांस्कृतिक , धार्मीक कार्यक्रमात हिरहीरीने सहभाग घेणारे सामाजिक कार्यकर्ते तसेच भारतीय जनता



पार्टी चे नवनिर्वाचीत बिलोली मंडळ अध्यक्ष इंद्रजित तुडमे यांच्या दि.२ मे या दिवशी वाढदिवसा निमित्त मित्र परिवाराच्या वतीने नविन बसस्थानक परिसरात वृक्ष लागवड, व बिलोली उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप तसेच मागास असलेल्या फासे पारधी समाजा सोबत वाढदिवस साजरा करुन त्या महिलांना साडी चोळी आणि मिष्ठांन फराळाचे वाटप करण्यात आले

यावेळी अभिजीत तुडमे, दिलीप उत्तरवाड, प्रदिप अंकुशकर , प्रताप अंकुशकर, प्रशांत अंकुशकर, राजकुमार गादगे, अमोल मोळके, साईनाथ शिरोळे , सतिष बळवंतकर ,नितीन उपलवार जगनाथ मेघमाळे, मारोती पांडागळे ,विश्वजीत तुडमे, रोशन तुडमे, कृष्णा तुडमे , साईप्रसाद तुडमे, धिरज तुडमे, अंकित गादगे, बळवंत पा. लुटे,सय्यद रीयाज, संतोष उत्तरवाड,बाजीराव जाधव,दतात्र्य खंडेराय,प्रशांत गादगे, अनिल अंबेराय, शिवा स्वामी, साईनाथ शेट्टीवार आदी मित्र परिवार उपस्थित होते.

---

# नांदेड जिल्ह्यात केळी, मिरची आणि सोयाबीन संशोधन केंद्राला तत्काळ मंजुरी द्या - खासदार रवींद्र चव्हाण यांचा पालकमंत्र्यांकडे आग्रह

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**दत्ता पाटील माळेगावे**

**नांदेड /प्रतिनिधी -** नांदेड जिल्हामध्ये कृषी पिकावर



आधारीत केळी, मिरची आणि सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून बारड ता. भोकर येथे केळी क्लस्टर केंद्र ,धर्माबाद येथे मिरची संशोधन केंद्र आणि कासराळी ता. बिलोली येथे सोयाबीन प्रक्रिया केंद्र उभारण्यास तात्काळ मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

पालकमंत्री अतुल सावे १ मे रोजी नांदेड दौऱ्यावर आले असता खासदार रवींद्र चव्हाण यांनी त्यांची भेट घेतली. त्यांनी निवेदनात नमूद केले की,नांदेड जिल्ह्यात केळी पिकांसाठी

क्टस्टरची उभारणी, मिरचीसाठी संशोधन आणि सोयाबीन आधारीत विविध प्रक्रिया करण्याचे केंद्र निर्माण करणे अत्यंत गरजेचे . या तिनही केंद्रासाठी प्रामुख्याने नांदेड जिल्हयातील दिशा समितीच्या बैठकीत याबाबतचे ठराव पारीत करण्यात आलेले आहेत आणि त्यास दिशा समितीच्या सर्व सदस्यांनी सहमती दर्शवीलेली आहे.

या तिनही केंद्रास मंजूरी देऊन अधिसूचना काढण्याबाबत राज्य शासनाकडे शिफारस करण्यात यावी, अशी विनंती खासदार चव्हाण यांनी केली. नायगांव येथे बीओटी तत्वावर बसस्थानक उभारा

खासदार रविंद्र चव्हाण यांनी नायगाव येथे बीओटी तत्त्वावर बसस्थानक उभारण्याची मागणी पालकमंत्र्यांकडे दुसऱ्या एका निवेदनाद्वारे केली आहे.

**नांदेड जिल्हयातील नायगांव हे तालुक्याचे ठिकाण असून नांदेड ते हैद्राबाद तेलंगणा व कर्नाटक राज्य महामार्गावर असलेले ठिकाण आहे. या ठिकाणी अनेक वर्षापासून बसस्थानकाची मागणी प्रलंबित आहे. तत्कालीन आमदार वसंतराव चव्हाण यांचे मागणी नूसार तत्कालीन मुख्यमंत्री, परिवहनमंत्री यांचे सूचनेनूसार मुख्य रस्त्यालगत असलेल्या महसूल विभागाच्या गोदामाची जागा बसस्थानकाला देण्याबाबत आदेशीत करून गोदामासाठी तहसिलच्या जवळ पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचे आदेश ही देण्यात आले आहेत. त्यानूसार गोदाम बांधून पूर्ण झाले पण गावातील रस्त्यालगतची जागा तशीच मोकळी आहे. आणि अद्याप बसस्थानक झाले नाही.**

**त्या जागेवर अतिक्रमण होण्याची दाट शक्यता आहे म्हणून सदरची जागा महसूल विभागाकडून परिवहन विभागाकडे हस्तांतरीत करून बीओटी तत्वावर बसस्थानक बांधण्यात यावे. जेणे करून प्रवाशांची सोय आणि सुविधा होईल तसेच विभागाचे आर्थीक उत्पन्न वाढेल. यासंदर्भात परिवहन मंत्री, प्रतापराव सरनाईक यांना १९ मार्च रोजी निवेदन सादर करण्यात आले आहे असे या नमूद करण्यात आले आहे. यासाठी जिल्हाधिकारी तसेच परिवहन विभाग नांदेड यांचे मार्फत अहवाल महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्याबाबत सुचित करण्यात यावे, अशीही मागणी खासदार रवींद्र चव्हाण यांनी निवेदनात केली.**